(असाधारण)
अधिसूचना

क्रमांक :- ०४ /२०२५. **दिनांक : ०१/०१/२०२५**

विषय : राष्ट्रीय शैक्षणिक धोरण – २०२० च्या अनुषंगाने पदवी स्तरावरील जेनेरिक/ओपन ईलेक्टिव्ह/आयकेएस/व्हीएससी विषयाचे अध्यापन करतांना शिक्षकांनी स्थानिक भाषा मराठी/हिंदी यांचा गरजेनुसार वापर करण्याबाबत..

सर्व सामान्यांच्या माहितीकरिता अधिसूचित करण्यात येते की, विद्या परिषदेने बाब क्रमांक ७८, दिनांक ०३/१०/२०२४ अन्वये घेतलेल्या निर्णयानुसार, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण – २०२० च्या अनुषंगाने पदवी स्तरावरील जेनेरिक / ओपन ईलेक्टिव्ह / आयकेएस / व्हीएससी विषयाचे अध्यापन करतांना शिक्षकांनी स्थानिक भाषा मराठी/हिंदी यांचा गरजेनुसार वापर करावा. तसेच विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिका लिहिताना स्थानिक भाषा मराठी/हिंदी/ इंग्रजी यापैकी कुठल्याही एका भाषेतून लिहिण्यास परवानगी प्रदान करावी. विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिका मराठी, इंग्रजी व हिंदी मध्ये लिहिण्याची मुभा राहील. प्राश्निकांनी प्रश्नपत्रिका मराठी, हिंदी व इंग्रजी या तिन्ही भाषेमध्ये तयार करावी.

स्वा/-
(डॉ.अविनाश असनारे)
कुलसचिव,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,
अमरावती.

*****